**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय,.....

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, मुंबई शहरात 2 हजार झोपड्या जळालेल्या आहेत. मागासवर्गीय, दलितांच्या झोपड्या जळालेल्या आहेत.

**उप सभापती :** सन्माननीय सदस्यांनी कृपया शांतता राखावी.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.:** सभापती तालिका नामनिर्देशित करणे

**उप सभापती :** मी महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील नियम 8 (1) अन्वये खालील सभासदांना सभापती तालिकेवर नामनिर्देशित केल्याचे घोषित करतो :-

1) श्री.नरेंद्र पाटील
2) ॲड.हुस्नबानू खलिफे
3) श्री.रामनाथ मोते
4) डॉ.निलम गोऱ्हे

-------

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**म.वि.प. नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनांबाबत**

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या संदर्भात मी म.वि.प.नियम 289 अन्वये सूचना दिलेली आहे.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय,....

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, तो विषय अत्यंत महत्वाचा आहे. परंतु, मी आपल्याला.....

( दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**उप सभापती :** सन्माननीय सदस्यांना बोलण्याची इच्छा असेल तर मी सर्व सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी देईन. तत्पूर्वी आपण सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांचे म्हणणे ऐकून घ्यावे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि मदत करण्याच्या दृष्टीने मी अत्यंत महत्वाच्या विषयावर म.वि.प. नियम 289 अन्वये सूचना दिलेली आहे.

सभापती महोदय, त्याच बरोबर मला एक तांत्रिक चूक सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे. मागील 65 वर्षात लोकशाही परंपरेमध्ये अशा प्रकारची आश्चर्यकारक घटना घडलेली नाही. जी घटना घडलेली आहे ती मी 10 सेकंदात सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. मला काल दिनांक 9 डिसेंबर, 2015 रोजी जे प्रश्न चर्चेला येणार आहेत त्याबाबतची सूची देण्यात आली होती. त्या सूचीतील अनुक्रमांक 11 वर "विदर्भ वेगळे राज्य करावे म्हणून होत असलेली मागणी आणि त्या संदर्भात शासनाची भूमिका" या विषयावरील माझा प्रश्न दाखविण्यात आला होता. परंतु, दिनांक 9 डिसेंबर, 2015 रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील अनुक्रमांक 11 वर मात्र "गडचिरोली जिल्ह्यातील वाढत्या नक्षलवादी कारवाया रोखण्याबाबत" असा प्रश्न दाखविण्यात आला होता. माझा अनुक्रमांक 11 वरील वेगळ्या विदर्भाचा प्रश्न बदलून त्याच क्रमांकावर दुसरा प्रश्न दाखविलेला आहे. या संदर्भात भारतीय जनता पक्षाच्या मंत्र्यांनी अशा प्रकारचे पत्र दिलेले आहे की, वेगळ्या विदर्भाचा विषय कालच्या कामकाजामध्ये उपस्थित करु नये, त्याबाबत प्रश्न विचारण्यात येऊ नयेत. एका बाजूला एक भमिका घ्यावयाची आणि दुसऱ्या बाजूला अशा प्रकारची भूमिका घ्यावयाची ? या संदर्भात शासनाचे धोरण काय आहे हे शासनाने जाहीर

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे.........

केले पाहिजे. या संदर्भात भारतीय जनता पक्षाचे धोरण काय आहे हे त्यांनी स्पष्ट केले पाहिजे, अशी आम्ही मागणी केली होती. सभापती महोदय, सदस्य या नात्याने मला न्याय मिळाला पाहिजे. संसदीय लोकशाही प्रणालीमध्ये कधीही अशी घटना घडलेली नाही. या संदर्भात आपण चौकशी करावी आणि कोणत्या मंत्र्यांनी पत्र दिले, भारतीय जनता पक्षाच्या कोणत्या मंत्र्यांनी या संदर्भात दबाव टाकला ते सुद्धा सभागृहाला कळले पाहिजे. अशा प्रकारे बोलायचे एक आणि करावयाचे एक ही कृती देखील विदर्भातील जनतेच्या लक्षात आली पाहिजे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या अत्यंत महत्वाच्या विषयावर मी म.वि.प. नियम 289 अन्वये सूचना दिलेली आहे. परंतु, तत्पूर्वी मी मघाशी जो मुद्दा मांडला त्याबाबत मला निर्णय अपेक्षित आहे.

सभापती महोदय, शिक्षक खूप लांबवरुन नागपूर येथे चालत आलेले आहेत. त्यांचाही विषय आहे आणि सन्माननीय सदस्य ॲड.रामहरी रुपनवर यांचाही विषय आहे. आपण प्रथम दोन म.वि.प. नियम 289 च्या सूचना घ्याव्यात. त्यानंतर मी शेतकऱ्यांच्या अत्यंत महत्वाच्या विषयावर म.वि.प. नियम 289 ची सूचना मांडणार आहे. आपण ती सूचना मांडण्यासाठी मला परवानगी, द्यावी अशी माझी विनंती आहे.

**उप सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी वेगळे विदर्भ राज्य करावे याबाबत होत असलेली मागणी या विषयावर जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्यावर मी निर्णय देतो.

वेगळे विदर्भ राज्य करावे याबाबत होत असलेली मागणी या संदर्भातील तारांकित प्रश्न क्रमांक 11594 हा मी मान्य करून माझ्या सचिवालयाने दिनांक 17 नोव्हेंबर, 2015 रोजी सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे पाठविला होता व त्या प्रश्नाच्या उत्तराच्या प्रती या सचिवालयास मिळण्याचा शेवटचा दिनांक 03 डिसेंबर, 2015 असा होता.

दिनांक 17 नोव्हेंबर, 2015 रोजी स्वीकृत करून या सचिवालयाने सामान्य प्रशासन विभागाकडे हा प्रश्न पाठविल्यानंतर हा विषय राज्य शासनाच्या अखत्यारीत येत नाही तो केंद्र शासनाच्या व संसदेच्या अखत्यारीत येतो अशा स्वरूपाचे पत्र या सचिवालयास प्राप्त झाले नव्हते.

..5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती.........**

मात्र दिनांक 1 डिसेंबर, 2015 रोजी या प्रश्नाचे उत्तर सामान्य प्रशासन विभागाने पाठविले. त्यावेळी सुद्धा या प्रश्नावर फेरविचार व्हावा असेही या सचिवालयास कळविण्यात आले नव्हते.

त्यानंतर मा.राज्यमंत्री, सामान्य प्रशासन विभाग यांनी सदर बाब ही राज्य शासनाच्या अखत्यारीतील नसून केंद्र शासनाच्या अखत्यारीतील आहे असे मला कळविले व त्यांचे पत्र कार्यालयात दिनांक 8 डिसेंबर, 2015 रोजी प्राप्त झाले व त्यांनी अशी विनंती केली की, सदर प्रश्नावर फेरविचार करण्यात यावा.

वास्तविक पाहता ही बाब ज्यावेळी विधीमंडळ सचिवालयाने दिनांक 17 नोव्हेंबर, 2015 रोजी सामान्य प्रशासन विभागास स्वीकृत प्रश्न पाठविला त्यावेळी निदर्शनास आणून दिली असती तर त्याचवेळी याबाबत योग्य तो निर्णय घेणे मला सोईचे झाले असते.

..B...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती....**

आता वेळेवर कोणताही बदल न करता प्रश्न यादीमध्ये आहे त्याच स्थितीत ठेवण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर माननीय संसदीय कार्य मंत्री हे स्वत: येऊन माझ्या दालनात मला भेटले. त्या अनुषंगाने मी प्रधान सचिव यांच्या बरोबरही चर्चा केली. जर सदर बाब केंद्र शासनाच्या अखत्यारित आहे तर या प्रश्नावर माननीय राज्यमंत्री यांनी केलेल्या विनंती प्रमाणे तसेच माननीय संसदीय कार्यमंत्री यांनी केलेल्या विनंती नुसार मी फेरविचारांती सदर प्रश्न एक अपवादात्मक बाब म्हणून अस्वीकृत करण्याचा निर्णय घेतला आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मला असे म्हणावयाचे आहे की,...

**उप सभापती** : याबाबत आता निर्णय झालेला आहे, त्यामुळे यावर आता कोणालाही बोलता येणार नाही.

(काही सन्माननीय सदस्य एकत्र बोलण्याचा प्रयत्न करतात)

**उप सभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांनी माझे म्हणणे ऐकून घ्यावे. सर्वपक्षीय सन्माननीय सदस्य माझ्या दालनात उपस्थित असताना आजच्या कामकाजाबाबत आपण निर्णय घेतलेला आहे. सर्वपक्षीय सहमती घेऊन आपण आजचे कामकाज करीत आहोत. आता जे कामकाज करण्यात येत आहे त्यासाठी सर्वपक्षीय सदस्यांची सहमती घेतली असल्यामुळे आता कोणीही कोणताही विषय उपस्थित करु नये.

----------

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : आज दिनांक 10 डिसेंबर, 2015 रोजी श्री.कपिल पाटील. वि.प.स. यांनी "15 वर्षे विनावेतन शोषण आणि दारिद्र्याने गांजलेल्या शिक्षकांनी सेवाग्रामहून आणि शेगावहून नागपूरला पायी चालत दिंडी काढणे, नागपूर अधिवेशनामध्ये या शिक्षकांनी ठिय्या आंदोलन करणे" या विषयाबाबत म.वि.प.नियम 289 अन्वये सूचना दिली आहे, त्यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी आपला आभारी आहे, गेली 15 वर्षे विनावेतन शोषण आणि दारिद्र्याने गांजलेले या राज्यातील 15 हजाराहून अधिक शिक्षक सेवाग्राम व शेगाव येथून पायी चालत आले आहेत. भर थंडीत त्यांनी ठिय्या आंदोलन केले आहे. शासनाकडून त्यांचे अपरिमीत शोषण सुरु आहे. त्यांची मागणी अशी आहे की, ताबडतोब आमचे वेतन सुरु करावे. काल माननीय शिक्षणमंत्री श्री. विनोद तावडे यांनी एक पाऊल पुढे टाकले आहे. यासंदर्भात त्यांनी सभागृहात काल निवेदन केले आहे. त्या निवेदनामुळे शिक्षकांचे समाधान होण्याऐवजी त्यांच्या मनात संभ्रम व संतापाची भावना तयार झाली आहे. काल शिक्षणमंत्री महोदयांनी एक चांगला मुद्दा सांगितला होता. त्याबाबत मी त्यांचे अभिनंदन करतो. गेली अनेक वर्षे चलाखीने वेतन देण्याचे टाळण्यात आले होते. निधीच्या उपलब्धतेनुसार वेतन देण्यात आले आहे. त्यांनी बरोबर मुद्दा उपस्थित केला होता. या सरकारकडून आमची अपेक्षा अशी आहे की, अशी चलाखी आपल्या सरकारकडून अपेक्षित नाही. या सरकारने एक पाऊल आणखी पुढे टाकावे. निधीच्या उपलब्धतेशी हा प्रश्न जोडण्यात येऊ नये. वेतन देण्याचे आपण कबूल करीत आहात तर ते ताबडतोब देण्यात यावे. बजेटमध्ये तरतूद नंतर होईल पण आजपासून आम्ही वेतन देणार आहोत, हे ठामपणे सांगितले तर शिक्षकांचे समाधान होईल. आज 15 हजार कुटुंबे उघड्यावर आहेत. त्या कुटुंबीयांना वेतनाचा कोणताही आधार नाही. त्या लोकांनी किती काळ शोषण सहन करावे. या बहुसंख्य मराठी व भाषिक शाळा आहेत. या शाळा वाचविण्याची जबाबदारी शासनाची आहे. राईट टू एज्युकेशन हा कायदा 1 एप्रिल, 2010 पासून स्वीकारल्यानंतर या सर्व शिक्षकांना वेतन मिळण्यास ते पात्र ठरत आहेत. त्यांना वेतन देण्याची कार्यवाही आजपर्यंत झालेली नाही.

सभापती महोदयांना माझी विनंती आहे की, आपण शिक्षणमंत्री महोदयांना सांगावे व याबाबत सभागृहात चर्चा घडवून आणावी, सर्व शिक्षकांचे समाधान करुन त्यांचे शोषण थांबवावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

त्यांचे वेतन तात्काळ सुरु करण्यासाठी निधीची कमतरता पडणार नाही. कारण माननीय वित्तमंत्री अत्यंत सहह्रदयी आहेत. ताबडतोब ते निधी उपलब्ध करुन देतील. शिक्षमंत्री महोदयांनी एक पाऊल पुढे टाकले पाहिजे. हा विषय निधीच्या उपलब्धतेशी जोडायला नको. याबाबत शासनाने भूमिका मांडावी व या विषयावर शासनाने निवेदन करावे किंवा चर्चा घेण्यास सभापती महोदयांनी परवानगी द्यावी अशी मी विनंती करतो.

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी अत्यंत महत्वाचा विषय उपस्थित केला आहे. या शिक्षकांनी आजपर्यंत जवळपास 400 ते 500 वेळा आंदोलने केली आहेत. हा केवळ शिक्षकांचा प्रश्न नसून ग्रामीण भागातील दलित सामान्य कुटुंबीयांच्या मुलांचा प्रश्न आहे. माननीय शिक्षणमंत्री यांनी निवेदन करताना शासनाच्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले आहे. परंतु शासनाला आमची विनंती आहे की, मार्च महिन्यापासून हे अनुदान तातडीने देण्यात येईल अशी घोषणा करावी.

**उप सभापती** : तुमच्या दृष्टीने खऱ्या अर्थाने आज सोन्याचा दिवस आहे. शिक्षणमंत्री यांचे अभिनंदन सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी केले आहे. काल सोनिया गांधी यांचा वाढदिवस झाला, काल ही बाब आपणाला सुचली नाही. पण उशिरा का होईना ही बाब मला आज सुचली आहे. त्यामुळे मी दोघांचेही मनापासून अभिनंदन करतो.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मी व कपिल पाटील यांनी येथे नियम 289 ची सूचना मांडलेली आहे. त्यामुळे हा विषय तातडीने चर्चेला घेण्याची गरज आहे. माननीय मंत्री श्री.विनोद तावडे यांचे निवेदन आम्ही ऐकले आहे. त्यांची भूमिका सकारात्मक आहे. पंरतु कोणत्या तारखेपासून ते विनाअनुदानित शाळांना अनुदान देणार आहेत व शिक्षकांना वेतन केंव्हापासून देणार आहेत ही बाब त्यांनी तातडीने स्पष्ट केली पाहिजे.

**उप सभापती** : मंत्री महोदयांनी या विषयावर निवेदन करावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी काल केलेले निवेदन अतिशय स्पष्ट आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनाची तारीख अद्याप ठरलेली नाही त्यामुळे यासंदर्भातील तारीख मी जाहीर करु शकत नाही. कालचे निवेदन अतिशय स्पष्ट आहे. मी असे म्हणालो होतो की, शासकीय नियम

....4...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

व निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांची अडचण अशी आहे की, ते ठरवून व पाहिजे तेच वाचतात. मी यामध्ये कोणतीही चलाखी केलेली नाही. ही चलाखी ज्यांनी केली त्यावेळी ती त्यांनी सहन केली आहे. आज जे सन्माननीय सदस्य बोलत आहेत ते त्यावेळी बोलत नव्हते. तत्कालीन शिक्षणमंत्री श्री.राजेंद्र दर्डा बोलत असताना सर्व सदस्य गप्प बसले होते. शिक्षक प्रामाणिकपणे विद्यार्थी घडविण्याचे काम करीत आहेत. शिक्षकांच्या विषयासंदर्भात सन्माननीय सदस्य सर्वश्री. रामनाथ मोते, नागो गाणार, विक्रम काळे, प्रा.अनिल सोले इतर सर्व सदस्यांनी त्या त्यावेळी विषय मांडले असतील. त्यावेळी मी मोकळेपणाने अनुदान देणे शक्य नाही असे सांगितले होते. यावेळी माननीय मुख्यमंत्री व माननीय वित्तमंत्री यांच्याशी माझी चर्चा झाली आहे. या विषयाबाबत मी नीट अभ्यास करीत असून अद्यापही 8 ते 9 टक्के शाळांच्या त्रुटी आहेत त्यामुळे यासंदर्भातील यादी पूर्ण तयार झालेली नाही. ही बाब करताना शासनाचे काही नियम आहेत. बजेटमध्ये यासंदर्भातील घोषणा करण्यात येईल असे मी म्हटलेले आहे. ज्या शाळांचे अनुदान सुरु करावयाचे आहे, त्या शाळांची आकडेवारी माझ्याकडे आली आहे. आपल्या राज्यात दहा शाळांची विद्यार्थी संख्या शून्य आहे. त्या शाळांमध्ये 21 शिक्षक असून त्यांचे वेतन सुरु आहे. एक विद्यार्थी असणाऱ्या 75 शाळा आहेत. दोन विद्यार्थी असणाऱ्या 214 शाळा आहेत. तीन विद्यार्थी असणाऱ्या 253 शाळा आहेत. शून्य विद्यार्थी असणाऱ्या चार शाळा सरकारी आहेत, सहा शाळा अनुदानित संस्थेच्या आहेत. अशा शिक्षकांना नोकरीतून कमी करण्यात आले नाही. कारण शिक्षकांना नोकरीतून कमी करणे योग्य नाही. या शिक्षकांचे इतर शाळांमध्ये समायोजन केले पाहिजे. समायोजन करण्यात येऊ नये म्हणून कोर्टात जाऊन स्थगिती आणली जाते. अतिरिक्त शिक्षकांनी शिक्षण देण्यासाठी त्यांना वेळीच चांगल्या शाळेत पाठविले पाहिजे. परंतु अशी कार्यवाही थांबवणारी मंडळी आपल्या येथे बसलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना मी सांगू इच्छितो की, या संदर्भात मार्ग काढताना व वित्त खात्याला समजावून सांगताना शून्य,एक,दोन व तीन विद्यार्थी असणाऱ्या शाळांवर जो निधी वाया जातो तो वाचविला तर त्याचा उपयोग इतर ठिकाणी करता येईल यासाठी कोणीही सहकार्य करीत नाहीत. कोर्टात पीआयएल दाखल करतात व स्थगिती आणतात. मला असे म्हणावयाचे आहे की (...अडथळा...)....

.....C.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

अभ्यासार्थ प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.......

सगळयांचे वक्तव्य आहे, सगळयांचे वॉटस् अप आहे. काय पध्दती आहे याची आपल्याला माहिती आहे. काल सभागृहात जे शिक्षक आमदार बसलेले होते, त्यातील काही माननीय सदस्य सभागृहातून निघून गेले, काहींना थांबविले गेले. माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते व माननीय सदस्य श्री.नागो गाणार यांच्यामुळे नाही, आमच्यामुळे झाले असे काहींचे म्हणणे होते. परंतु आम्ही निर्णय करीत आहोत. माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांचे मी अभिनंदन करतो. त्यांनी मुंबईतील शिक्षकांना आंदोलनामध्ये सहभागी होऊ दिले नाही. अनुदान मिळत असल्यामुळे आंदोलन केल्यास मुलांचे नुकसान होते हे त्यांनी पटवून दिले. शिक्षक विनाअनुदानित तत्वावर काम असल्यामुळे हलाखीचे जीवन जगत आहेत. दहा -दहा वर्षे काम करुनही त्यांना दीड ते दोन हजार रुपये इतके अल्प वेतन सुध्दा वेळेवर मिळत नाही. त्यांच्याबद्दल सहानुभूती असली पाहिजे. काल मला माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते व श्री.नागो गाणार माननीय मुख्यमंत्र्यांकडे घेऊन गेले. आम्ही त्या ठिकाणी चर्चा केली. त्यानंतर स्पष्ट केले की, येत्या अर्थसंकल्पात अनुदान देण्याविषयी शासनाचे जे नियम आहेत, निर्णय आहेत त्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल. काल सभागृहात इतका गोंधळ झाला की, मला भूमिका स्पष्ट करण्याची संधी मिळाली नाही. त्यामुळे मी ते निवेदन पटलावर ठेवले.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>कांदिवली (पूर्व), मुंबई येथील दामूनगर झोपडपट्टीला लागलेल्या आगीसंबंधी</u>**

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, मुंबई शहरातील कांदिवली (पूर्व) येथील दामूनगर झोपडपट्टीला सोमवारी आग लागून 2000 झोपड्या जळून खाक झाल्या. 2000 कुटुंबांचे संसार बेचिराख झाले. राज्यातील शेतकरी वर्गाबद्दल आम्हाला आस्था आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत चर्चा करण्याची संधी दिलेली असताना मागील तीन दिवस विरोधी पक्षाकडून सभागृहाचे कामकाज बंद पाडण्यात आले. त्यामुळे दामूनगर झोपडपट्टीचा विषय मला सभागृहात उपस्थित करता आला नाही. या झोपडपट्टीमध्ये मागासवर्गीय समाजाचे लोक मोठ्या प्रमाणात राहतात. त्यांच्या झोपड्या जळून खाक झाल्यामुळे त्यांना पर्यायी निवाऱ्याची शासनाने सोय करावी अशी मागणी केली जात आहे. ज्यांचे संसार उद्ध्वस्त झाले ते शासनाकडे आशेने पहात आहेत. त्यांच्या दैनंदिन अन्नधान्याची सोय स्वयंसेवी संस्थांमार्फत केली जात आहे. परंतु हक्काचा निवारा मिळवून देण्यासाठी शासनाने निर्णय घेणे आवश्यक आहे. म्हणून मी शासनाला विनंती करतो की, या विषयाबाबत तातडीने निर्णय जाहीर करून दामूनगर झोपडपट्टीला लागलेल्या आगीमध्ये ज्यांची घरे आगीत जळाल्यामुळे नुकसान झाले आहे त्यांना न्याय मिळवून द्यावा.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, निवेदन करण्यात येईल.

------------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>धनगर समाजाला अनुसूचित जातीच्या सवलती लागू करणेबाबत</u>**

श्री.रामराव वडकुते : सभापती महोदय, या राज्यामध्ये धनगर समाजाची लोकसंख्या दीड कोटी इतकी असून या समाजाला आदिवासी समाजाच्या सवलतीपासून वंचित ठेवण्यात आल्यामुळे मोठया प्रमाणात असंतोष निर्माण झाला आहे. दोन दिवसापूर्वी हजारोंच्या संख्येने धनगर समाजाच्या लोकांचा मोर्चा आला होता. आजही धनगर समाजाचे हजारो लोक यशवंत स्टेडियम येथे जमले आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले होते की, पहिल्या कॅबिनेट बैठकीमध्ये निर्णय घेतला जाईल. घटनेनुसार धनगर समाजाचा आदिवासी जातीमध्ये 36 व्या क्रमांकावर उल्लेख असूनही सरकार त्यापासून यु टर्न घेत आहे. 4 जानेवारी, 2015 रोजी माननीय मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले होते की, ॲडव्होकेट जनरल यांचा सल्ला घेऊन 15 दिवसात निर्णय घेण्यात येईल. ॲडव्होकेट जनरल यांचा सल्ला सरकारला प्राप्त झाला आहे अशी माझी माहिती आहे. त्यांनी सरकारला असा सल्ला दिला आहे की, धनगर समाजाला आदिवासींच्या सवलती लागू करण्याबाबत केंद्र सरकारला शिफारस करावी. ॲडव्होकेट जनरल यांनी इतका स्पष्ट सल्ला सरकारला दिला असल्यामुळे सरकार आता कशाची वाट पहात आहे? धनगर समाजाचा 36 व्या क्रमांकावर आदिवासी म्हणून जो उल्लेख केलेला आहे त्याची अंमलबजावणी करावी आणि शासनाने त्याबाबत ठोस निर्णय घेऊन निवेदन करावे अशी मी विनंती करतो. शासनाने असा निर्णय घेतला तर धनगर समाजामध्ये असलेला असंतोष दूर होऊ शकतो. मागील दोन वर्षापासून धनगर समाज आपल्या न्याय मागण्यासाठी रस्त्यावर येत आहे. घटनेने या समाजाला जो अधिकार दिलेला आहे तो अधिकार दडपण्याचे काम होता कामा नये. सरकारने या प्रश्नाबाबत निवेदन करावे व केंद्र सरकारला आदिवासींच्या सवलती लागू करण्याबाबत तातडीने शिफारस करावी अशी विनंती करतो.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, नियम 289 अन्वये आम्ही जी सूचना मांडली होती त्या अनुषंगाने शेतकऱ्यांच्या विषयाबाबत सभागृहात चर्चा सुरु झाली पाहिजे.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, नियमानुसार आता प्रश्नोत्तराचा तास सुरु झाला पाहिजे. माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना बोलण्यासाठी अनुमती दिल्याबद्दल मला काही म्हणावयाचे नाही.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामराव वडकुते : धनगर समाजाला आदिवासींच्या सवलती लागू करण्याबाबत सरकारने भूमिका स्पष्ट केली पाहिजे.

**उप सभापती** : माझे म्हणणे सर्वांनी ऐकले तर सभागृहात प्रश्न उरणार नाही. माननीय संसदीय कार्यमंत्री यांना सांगू इच्छितो की, सभागृहाची बैठक सुरु होत असताना विधानसभेतील कामकाजामुळे आपल्याला सभागृहात यायला किंचित विलंब झाला. सभागृह सुरु होण्यापूर्वी माझ्या दालनामध्ये सर्वपक्षीय नेते मंडळी चर्चेसाठी बसली होती. त्यांच्याकडून जी मते मांडण्यात आली त्यानुसार सर्वांचे मतैक्य झाल्यानंतर आम्ही सर्वजण सभागृहात आलो. माझ्या दालनात झालेला जो संवाद होता तो मी या ठिकाणी सांगू इच्छितो. त्यानंतर आपण पुढील सेन्स घेऊ.

(सभागृहात अनेक माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्यासाठी उभे असतात)

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, दोन विषय महत्वाचे असल्यामुळे आम्ही सांगितलेली विनंती आपण मान्य केली.

**उप सभापती** : सभागृहात गोंधळ घालण्यापेक्षा मघाशी माझ्या दालनात जी नेते मंडळी चर्चेसाठी बसली होती त्यांनी पुन्हा एकदा पाच मिनिटांकरिता माझ्या दालनात चर्चेसाठी यावे, तेथे चर्चा करून अंतिम निर्णय घेऊ. मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांकरिता तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.29 ते 12.44 पर्यंत स्थगित झाली.)

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगिती नंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**<u>नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी</u>**

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना आम्ही दिली आहे. शासनाने शेतकऱ्यांना कर्ज माफी दिली पाहिजे, शेतकऱ्यांना एकरी मदत दिली पाहिजे यासंबंधी गेल्या चार दिवसांपासून आम्ही विषय मांडीत आहोत. शासनाने सर्वात पहिली कर्ज माफीची घोषणा केली पाहिजे. त्यानंतर आम्ही चर्चा करायला तयार आहोत. या संबंधी शासनाने पहिल्यांदा कर्ज माफीची घोषणा केली पाहिजे.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य हातात फलक घेऊन हौद्यात येऊन घोषणा देतात.)

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्याचे ॲडव्होकेट जनरल ॲड.श्रीहरी अणे यांनी स्वतंत्र विदर्भासंबंधी केलेल्या वक्तव्याबद्दल औचित्याचा मुद्दा**

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य हातात फलक घेऊन हौद्यात येऊन घोषणा देतात.)

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आज सर्व शेतकऱ्यांचे या प्रश्नाकडे लक्ष लागलेले असले तरी सुद्धा माझा एक औचित्याचा मुद्या आहे. माझा औचित्याचा मुद्दा संयुक्त महाराष्ट्रासंबंधातील आहे.

**खरा वीर वैरी पराधीनतेचा**
**महाराष्ट्र आधार या भारताचा**

अशा प्रकारची भूमिका शासनाने घ्यावी म्हणून संयुक्त महाराष्ट्रातील लोकांचे लक्ष लागलेले आहे. ॲडव्होकेट जनरल या पदावर असणारे ॲडव्होकेट श्रीहरी अणे यांनी जे वक्तव्य केले आहे त्यासंबंधी गेल्या चार दिवसामध्ये एका शब्दाचीही चर्चा सदनामध्ये झालेली नाही. यात दोन प्रश्न येतात. एक म्हणजे राज्य शासनाचा कुठलाही धोरणात्मक निर्णय नसताना एखादी व्यक्ती.....

**उप सभापती** : एवढ्या गोंधळामध्ये मला कामकाज करणे शक्य नाही. मी आपणा सर्वांना विनंती करतो की, आपण सर्वांनी आपापल्या आसनावर शांतपणे जाऊन बसावे. मी पुढचे कामकाज आटोपून घेतो.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी घोषणा देतात.)

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, कोणत्याही व्यक्तीने एखाद्या पदावर असताना, वेगळ्या प्रकारचे वकीलपत्र घेतले असेल तर हा कुप्रशासनाशी संबंधीत असा मुद्दा आहे हे मला येथे मुख्यत: सांगावयाचे आहे.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य हातात फलक घेऊन हौद्यात येऊन घोषणा देतात.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती :** सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे आपण कोणत्या आयुधानुसार कोणत्या विषयावर बोलत आहात ?

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य हातात फलक घेऊन हौद्यात येऊन घोषणा देतात.)

डॉ.नीलम गोऱ्हे : माझी सरकारकडून ही अपेक्षा आहे की, ॲडव्होकेट जनरल या पदावर असणारी व्यक्ती ॲड.श्रीहरी अणे यांना या पदावरून मुक्त केले पाहिजे. तसेच, संयुक्त महाराष्ट्राची भूमिका योग्य पद्धतीने मांडेल अशा वकिलाची नियुक्ती त्या पदावर झाली पाहिजे, असे मला सांगावेसे वाटते.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य हातात फलक घेऊन हौद्यात येऊन घोषणा देतात.)

**उप सभापती :** सभागृहाचे कामकाज याच पद्धतीने चालणार असेल तर ते होऊ शकणार नाही. मी आपणा सर्वांना विनंती करतो की, आपण शांतपणाने सभागृहाचे कामकाज करू या.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य हातात फलक घेऊन हौद्यात येऊन घोषणा देतात.)

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीमध्ये ठरल्याप्रमाणे आज अशासकीय कामकाज विरोधी पक्षाच्या विनंतीवरून घेतले आहे. त्यामुळे आपण आजच्या कामकाजाला सुरूवात करावी. या विषयावरील चर्चा माननीय सभापतींनी राखून ठेवलेली आहे. माननीय सभापती सांगतील त्यावेळी ही चर्चा घेण्यात येईल. आम्ही केव्हाही चर्चेला तयार आहोत. तेव्हा माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी आपापल्या आसनावर जाऊन बसावे.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य हातात फलक घेऊन हौद्यात येऊन घोषणा देतात.)

**उप सभापती :** सभागृहाचे कामकाज मी एक तासाकरिता तहकूब करीत आहे.

(दुपारी 12.50 ते 1.50 वाजेपर्यंत बैठक स्थगित झाली.)

E-1..........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी मा.उपसभापती)**

**नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी**

श्री.संजय दत्त :सभापती महोदय, मी अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासून नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. अधिवेशन सुरु झाल्यापासून प्रत्येक दिवशी इतर महत्वाचे विषय आल्यामुळे मला माझ्या नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेवर विचार मांडण्याची संधी मिळाली नाही. महाराष्ट्र राज्याचे महाधिवक्ता माननीय श्री.श्रीहरी अणे साहेबांनी एक खळबळ जनक वक्तव्य केले आहे की, राज्याचा विकास वेगळा विदर्भ झाल्याशिवाय होऊ शकत नाही व यासंदर्भात केंद्रसरकारने विदर्भामध्ये रेफरंडम करणे आवश्यक आहे. मी उपस्थित केलेला विषय नियम 289 अन्वयेच्या सूचनेचा कसा होतो हे मला या ठिकाणी मांडावयाचे आहे. या चर्चेच्या माध्यमातून मी महत्वाचे 3 विषय उपस्थित करणार आहे. पहिला विषय असा आहे की, माझा जो सीमित विषय आहे त्या प्रमाणे राज्याचे ॲडव्होकेट जनरल जे मत वक्तव्य करतात ते राज्याचे मत समजले जाते व राज्याचे प्रवक्ते म्हणून ते बोलत असतात. दुसरा विषय असा आहे की, आजपर्यंतचा जो पूर्व इतिहास आहे त्या पूर्व इतिहासाप्रमाणे राज्याच्या ॲडव्होकेट जनरलने कधीही पर्सनल ओपिनियन किंवा राज्य सरकारपासून वेगळे ओपिनियन व्यक्त केल्याचा इतिहास आमच्या तरी लक्षात नाही. असा काही इतिहास असेल तर तो आमच्या निदर्शनास आणून द्यावा. माझा तिसरा मुद्दा असा आहे की, राज्याचे माननीय मुख्यमंत्री महोदय हे शिस्तप्रिय आहेत असे आम्हाला सांगण्यात आले आहे. राज्याचे काम हे नॉर्म्सप्रमाणे चालत असते. श्री. अणे साहेबांनी अशा प्रकारचे वक्तव्य केल्यानंतर या विषयाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री साहेबांनी फार मोघम खुलासा केलेला आहे. ज्या ॲडव्होकेट जनरलने संविधानाच्या आधारावर महाराष्ट्राच्या ॲडव्होकेट जनरल म्हणून शपथ घेतली तो ॲडव्होकेट जनरल वेगळया राज्याची मागणी करु शकतो काय ? परंतु या विषयाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी काहीही स्टेटमेंट केले नाही. ॲडव्होकेट जनरलची ही माहिती माध्यमामध्ये आल्यानंतर त्यावर माघार घेणे किंवा दिलगिरी व्यक्त करण्यापेक्षा त्यांनी असे सांगितले की, मी माझ्या मतावर ठाम आहे. अशा प्रकारची संविधानिक परिस्थिती देशातील कोणत्याही राज्यात या पूर्वी निर्माण झाली नव्हती ती आपल्या राज्यात निर्माण झालेली आहे. त्यामुळे राज्य सरकारने ॲडव्होकेट जनरल यांना पदमुक्त केलेच पाहिजे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

...2...

श्री.संजय दत्त.....

पद मुक्त झाल्यानंतर श्री.अणे यांनी आपले व्यक्तिगत मत खुशाल व्यक्त करावे. लोकशाहीने सर्वांना व्यक्तिगत मत व्यक्त करण्याचा अधिकार दिलेला आहे. परंतु ॲडव्होकेट जनरल हे महाराष्ट्र राज्याला रिप्रेझेन्ट करीत असल्यामुळे ते व्यक्तिगत मत व्यक्त करु शकत नाही. त्यांनी व्यक्तिगत मत व्यक्त केले असेल तर त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे अशी आमची मागणी आहे. त्यांच्यावर कारवाई झाली नाही तर यापुढेही अशा प्रकारचे व्यक्तिगत मांडले जाईल. हा विषय फार गंभीर आहे. या विषयावर सभागृहाच्या सर्व सन्माननीय सदस्यांना आपले मत व्यक्त करावयाचे आहे. आपण मला नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना मांडण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो. या विषयावर सर्व सन्माननीय सदस्यांना विचार मांडण्याची संधी आपण द्यावी अशी आशा बाळगून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेवर मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. महाराष्ट्रापासून नागपूर वेगळा करण्याची भूमिका राज्याचे ॲडव्होकेट जनरल मांडत आहेत ती या महाराष्ट्राची शोकांतिका आहे. माननीय संजय दत्त यांनी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेवर चर्चा उपस्थित करण्याचा प्रयत्न केला आहे त्याचे मी समर्थन करीत आहे. महाराष्ट्राचा सीमा प्रश्न सुप्रीम कोर्टात प्रलंबित असून त्याचा निकाल महाराष्ट्राच्या बाजूने लागेल असे चित्र असताना महाराष्ट्राचे विभाजन करण्याचा डाव या ठिकाणी केला जात असल्यामुळे या विषयावर या सभागृहात झाली पाहिजे व त्या चर्चेला राज्य शासनाने उत्तर दिले पाहिजे. राज्य शासन येथे बसलेले असून या विषयाच्या संदर्भात राज्य शासनाचे काय म्हणणे आहे हे आम्हाला कळले पाहिजे. या विषयावर राज्य शासन चर्चेला तयार असून वेगळया विदर्भाचे राज्य शासन समर्थन करीत नाही यासंदर्भात सन्माननीय मंत्री महोदय, श्री. दिवाकर रावते यांनी राज्य शासनाचे मत या ठिकाणी व्यक्त केले पाहिजे. ॲडव्होकेट जनरल यांना काही मर्यादा आहेत. ॲडव्होकेट जनरल यांनी असेही वक्तव्य केले आहे की, मला माननीय राज्यपालांनी नियुक्त केले आहे. परंतु त्यांना माननीय राज्यपालांनी नियुक्त केले नसून, राज्य शासनाच्या शिफारशीमुळे माननीय राज्यपालांनी त्यांची नियुक्ती केलेली आहे. हा प्रश्न अतिशय गंभीर आहे. या सभागृहात शेतकरी कर्जमुक्त झाला पाहिजे अशीही चर्चा होत आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

त्यामुळे ॲडव्होकेट जनरलने जे मत व्यक्त केले आहे त्या विषयाची चर्चा या सभागृहात होणे आवश्यक असून या विषयावर राज्य शासन आपले मत व्यक्त करेल काय ?एवढीच या प्रसंगी माझी मागणी आहे.

...F-1/....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, मला एक मुद्दा निदर्शनास आणावायचा आहे. भारतीय राज्य घटनेच्या अनुच्छेद 165 मध्ये राज्याच्या महाअधिवक्त्याची नियुक्ती करताना कोणकोणत्या तरतुदी असतात त्या मी वाचून दाखवितो.

1. प्रत्येक राज्याचा राज्यपाल, उच्च न्यायालयाचा न्यायाधीश म्हणून नियुक्त होण्यास जी व्यक्ती अर्हताप्राप्त असेल अशा एखाद्या व्यक्तीस राज्याचा महाअधिवक्ता म्हणून नियुक्त करील. It means the Advocate General is at par and is equal to the Hon'ble Judge of the High Court. हा त्याचा अर्थ झाला.

2. राज्यपालाकडून महाअधिवक्त्याकडे वेळावेळी निर्देशिल्या जातील अशा विधिविषयक बाबींवर राज्य शासनाला सल्ला देणे आणि त्याला नेमून दिली जातील अशी इतर विधिविषयक कामे करणे आणि या संविधानाद्वारे किंवा त्याखाली किंवा त्या त्या काळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याद्वारे किंवा त्याखाली त्याच्याकडे सोपविण्यात आलेली कार्ये पार पाडणे, हे त्याचे कर्तव्य असेल. राज्य शासनाने त्यांना हे कर्तव्य सांगितले होते काय याचे सरकारला उत्तर द्यावे लागेल. महाअधिवक्ता सुमोटो काही बोलू शकत नाही असा त्याचा अर्थ होतो. सरकार त्यांना सांगेल त्याच्यावरच त्यांनी बोलले पाहिजे. Because he speaks in the Court and he speaks openly in the Hon'ble Court. हे राज्य सरकारने त्यांना सांगितले होते काय असा एक घटनात्मक प्रश्न निर्माण झालेला आहे.

3. महाअधिवक्ता राज्यपालांची मर्जी असेपर्यंत अधिकारपद धारण करील, आणि त्यास राज्यपाल निर्धारित करील असे पारिश्रमिक मिळेल. म्हणजे जे काही मानधन असेल ते मिळेल. माझा असा मुद्दा आहे की, यामध्ये राज्य सरकारची जी जबाबदारी आहे ती पार पाडण्यात महाअधिवक्ता यांनी कसूर केलेली आहे. तेव्हा त्यांना ताबडतोब निलंबित करून माननीय राज्यपालांना त्याबाबत माहिती कळवावी अशी माझी सरकारला विनंती आहे.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

**उप सभापती :** आज दिनांक 10 डिसेंबर, 2015 रोजी श्री.संजय दत्त, वि.प.स. यांनी सकाळी 9.01 वाजता "स्वतंत्र राज्य झाल्याशिवाय विदर्भाचा विकास अशक्य असल्याचे प्रतिपादन राज्याचे महाअधिवक्ता ॲड.श्रीहरी अणे यांनी दिनांक 6 डिसेंबर, 2015 रोजी करणे, केंद्र सरकारने स्वतंत्र विदर्भाच्या मागणीवर सार्वमत घ्यावे अशी खळबळजनक मागणी ॲड.अणे यांनी करणे. राज्याच्या महाअधिवक्त्यांचे हे वक्तव्य अखंड महाराष्ट्राची मानहानी करणारे असल्याने सर्वात महत्वाचे संविधानिक पद सांभाळणाऱ्या ॲड.अणे यांना पदावरुन बडतर्फ करण्यात यावे" या विषयाबाबत म.वि.प.नियम 289 अन्वये सूचना दिली आहे. तसेच सारख्याच विषयावर दिनांक 9 डिसेंबर, 2015 रोजी सन्माननीय सदस्यांनी म.वि.प.नियम 93 अन्वये सूचना देखील दिली होती. त्याच प्रमाणे डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिनांक 7 डिसेंबर, 2015 रोजी औचित्याच्या मुद्याद्वारे सूचना दिली होती.

महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील एखादा नियम स्थगित करणे या संबंधाचा नियम 289 हा आहे. कोणत्याही सदस्यास माननीय सभापतींच्या अनुमतीने कोणताही नियम स्थगित करण्यासंदर्भात सूचना देता येईल.

यावरुन असे दिसून येते की, प्रश्नोत्तराचा तास किंवा इतर सगळे कामकाज स्थगित करण्यासाठी त्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात असे काम किंवा एखादा विशिष्ट प्रस्ताव सभागृहासमोर असणे आवश्यक आहे.

वरील विषय आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये समाविष्ट नसल्यामुळे मी ही सूचना अमान्य करीत आहे.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, ॲक्युपंक्चर चिकित्सा पद्धती संदर्भातील एक महत्वाचे विधेयक आज चर्चेसाठी आहे. आपण हे विधेयक प्रथम चर्चेसाठी घ्यावे अशी माझी आपणास विनंती आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती :** आपण मला बोलू द्याल की नाही ? आपण सांगितलेली प्रत्येक गोष्ट मी ऐकली आहे. मंत्री महोदयांनी माझ्याकडे विनंती केल्यानंतर मी ते विधेयक स्वत: वाचलेले आहे. हे विधेयक संमत होणे अत्यंत आवश्यक आहे.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**पृ.शी.:** ॲक्यूपंक्चर चिकित्सा पद्धती विधेयक

**L.A. BILL NO LVI OF 2015**

(A BILL TO PROVIDE FOR THE DEVELOPMENT OF THE ACCUPUNCTURE SYSTEM OF THERAPY, BY REGULATING THE TEACHING AND PRACTICE THEREOF AND TO DEAL WITH CERTAIN OTHER MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

श्री.विनोद तावडे (वैद्यकीय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 56- ॲक्यूपंक्चर चिकित्सा पद्धतीचे अध्यापन व व्यवसाय यांचे विनियमन करुन तिचा विकास करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक इतर विवक्षित बाबींच्या संबंधात तरतूद करण्याकरिता विधेयक मांडतो.

**उप सभापती :** विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 56-ॲक्यूपंक्चर चिकित्सा पद्धतीचे अध्यापन व व्यवसाय यांचे विनियमन करुन तिचा विकास करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक इतर विवक्षित बाबींच्या संबंधात तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती :** विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 41 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 56 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती :** सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 56 संमत झाले आहे.

-----



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती :** मी मघाशी गोंधळामध्ये 289 संदर्भातील निर्णय वाचून दाखविला. सन्माननीय सदस्यांनी विनंती केल्याप्रमाणे मी तो निर्णय पुन्हा वाचून दाखवित आहे.

आज दिनांक 10 डिसेंबर, 2015 रोजी श्री.संजय दत्त, वि.प.स. यांनी सकाळी 9.01 वाजता "स्वतंत्र राज्य झाल्याशिवाय विदर्भाचा विकास अशक्य असल्याचे प्रतिपादन राज्याचे महाअधिवक्ता ॲड.श्रीहरी अणे यांनी दिनांक 6 डिसेंबर, 2015 रोजी करणे, केंद्र सरकारने स्वतंत्र विदर्भाच्या मागणीवर सार्वमत घ्यावे अशी खळबळजनक मागणी ॲड.अणे यांनी करणे. राज्याच्या महाअधिवक्त्यांचे हे वक्तव्य अखंड महाराष्ट्राची मानहानी करणारे असल्याने सर्वात महत्वाचे संविधानिक पद सांभाळणाऱ्या ॲड.अणे यांना पदावरून बडतर्फ करण्यात यावे" या विषयाबाबत म.वि.प.नियम 289 अन्वये सूचना दिली आहे.

G-1.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या सभागृहाच्या काही प्रथा, परंपरा आणि पध्दती आहेत. हे सभागृह नियमाने चालणारे आहे. आपण विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांचा सन्मान म्हणून अगोदर निर्णय वाचून दाखविलेला दाखविलेला आहे. गोंधळामुळे सन्माननीय सदस्यांना आपला निर्णय ऐकू आला नाही म्हणून पुन्हा तोच निर्णय वाचून दाखविणे योग्य नाही. आपण अगोदर वाचून दाखविलेला निर्णय नोंद झालेला आहे. अगोदर वाचून दाखविलेला निर्णय पीठासीन अधिकाऱ्यांनी विसरणे आणि पुन्हा त्यांनी तो निर्णय वाचून दाखविणे, अशी नोंद होणे योग्य नाही. या ठिकाणी प्रत्येक गोष्टीची नोंद होत आहे. हा कार्यपध्दतीचा विषय आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांना गोंधळात निर्णय ऐकू आला नाही म्हणून मी तो निर्णय पुन्हा वाचून दाखवित आहे.

"तसेच सारख्याच विषयावर दिनांक 9 डिसेंबर, 2015 रोजी सन्माननीय सदस्यांनी म.वि.प. नियम 93 अन्वये सूचना देखील दिली होती. त्याच बरोबर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी देखील याच विषयाच्या बाबतीत दिनांक 7 डिसेंबर, 2015 रोजी औचित्याच्या मुद्याद्वारे सूचना दिली होती.

महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील एखादा नियम स्थगित करणे या संबंधीचा नियम 289 हा आहे. कोणत्याही सदस्यास माननीय सभापतींच्या अनुमतीने कोणताही नियम स्थगित करण्यासंदर्भात सूचना देता येईल. यावरुन असे दिसून येते की, प्रश्नोत्तराचा तास किंवा इतर सर्व कामकाज स्थगित करण्यासाठी त्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात असे काम किंवा असा एखादा विशिष्ट प्रस्ताव सभागृहासमोर असणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त विषय आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये समाविष्ट नसल्यामुळे मी ही सूचना अमान्य करीत आहे.

(विरोधी पक्षातील काही सदस्य फलक घेऊन पीठासीन अधिकाऱ्यांच्या आसनासमोर घोषणा देतात.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, म.वि.प. नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेवर माननीय सभापतींनी निर्णय दिलेला आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांना पुन्हा त्या विषयावर चर्चा सुरु करता येणार नाही.

(विरोधी पक्षातील काही सदस्य फलक घेऊन पीठासीन अधिकाऱ्यांच्या
आसनासमोर घोषणा देतच असतात.)

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण कृपया आपल्या जागेवर जाऊन बसावे. सभागृहासमोर थोडेसे काम बाकी आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी कृपया शांतता पाळावी.

(विरोधी पक्षातील काही सदस्य फलक घेऊन पीठासीन अधिकाऱ्यांच्या
आसनासमोर घोषणा देतच असतात.)

सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक दिवसभरासाठी स्थगित करतो.

( सभा□ृहाची बैठ□ दुपारी 2 वाजून 13 मिनिटांनी, शुक्रवार, दिनांक 11 डिसेंबर, 2015
रोजीच्या स□ाळी 11.00 वाजेपर्यंत स्थ□ित झाली )

---------

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही